# मराठी संकेतस्थळांची स्पर्धा २०१३ चा निकाल

राज्य मराठी विकास संस्थेने सीडॅक, मुंबई ह्यांच्या सहकार्याने 'मराठी संकेतस्थळांची स्पर्धा २०१३ ' ह्या स्पर्धेचे आयोजन केले होते. दि. १८/१२/२०१२पासून दि. १८/०१/२०१३पर्यंत http://www.rmvs.maharashtra.gov.in/rmvs ह्या राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच http://www.cdacmumbai.in ह्या सीडॅक, मुंबई ह्यांच्या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेशअर्ज उपलब्ध करून देण्यात आले होते. नोंदणी झाल्यावर पात्र ठरलेल्या संकेतस्थळांचे प्रथमतः तांत्रिक परीक्षण करण्यात आले तसेच दि. १५/०२/२०१३ रोजी तज्ज्ञ परीक्षकांकरवी अंतिम परीक्षण करण्यात आले. ह्यात शासकीय संकेतस्थळांच्या गटात १० संकेतस्थळे तर इतर संकेतस्थळे ह्या गटात ७४ संकेतस्थळे अशा एकूण ८४ संकेतस्थळांचा समावेश होता. परीक्षणांती स्पर्धेत पुरस्कारप्राप्त ठरलेली संकेतस्थळे पुढीलप्रमाणे आहेत.

**शासकीय संकेतस्थळे**

| पुरस्कार | संकेतस्थळ |
|---|---|
| **प्रथम पारितोषिक (रु. १५०००/-)** | अकोला जिल्हा परिषद http://akolazp.gov.in/ |
| **द्वितीय पारितोषिक (रु. १००००/-)** | म्हाडा http://mhada.maharashtra.gov.in/marathi / |
| **तृतीय पारितोषिक (रु. ५००० /-)** | राज्य निवडणूक आयोग http://mahasec.com/marathi/main.asp |

**इतर संकेतस्थळे**

| पुरस्कार | संकेतस्थळ |
|---|---|
| **प्रथम पारितोषिक (३५०००/-)** | भूगाव http://www.bhugaon.com/ |
| **द्वितीय पारितोषिक (२००००/-)** | यशवंतराव चव्हाण http://ybchavan.in/ |
| **तृतीय पारितोषिक (विभागून) (७५०० /-)** | केशवसुत http://keshavsut.com/kesha/ |
| **तृतीय पारितोषिक (विभागून) (७५०० /-)** | आधुनिक किसान http://www.adhunikkisan.com/ |

स्पर्धेचे परीक्षक म्हणून, डॉ. मंगेश करंदीकर, श्रीमती श्रद्धा काळेले, श्री. योगेश दंडवते, श्री. राहूल म्हैस्कर, श्री. अमोल सुरोशे, व श्री. प्रकाश पिंपळे ह्यांनी संकेतस्थळांचे परीक्षण केले.

स्पर्धेतील विजेत्या संकेतस्थळांना, दि. २७ फेब्रुवारी २०१३ रोजी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून, पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

**प्रशासकीय अधिकारी,**
**राज्य मराठी विकास संस्था,**
**मुंबई,**